फोन : २४०७७४४१
ग्राम : पर्सनग्रीड, मुंबई.
फॅक्स : २४०२५७६३

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं. १, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
साप्रवि / मावक / अनुशेष भरणेबाबत /
दिनांक :

**प्रशासकीय परिपत्रक क्र. १५० दि. ११/०४/ २००८**

**विषय :** मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढणेबाबत.

**संदर्भ :** शासन परिपत्रक क्र. बीसीसी - २००७ / प्र.क्र. ३१५/ १६- ब, दि. १४/ १२/ २००७.

**वाचा**

i ) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७७ दि. १५/०१/ २००३.
ii) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८९ दि. २१/०५/२००३.
iii) परिपत्रक क्र. १५१७ दि. १२/०६/२००३.
iv) परिपत्रक क्र. २२५० दि. १८/०८/२००३.
v) परिपत्रक क्र. ३०१२ दि. ०४/१२/२००३.
vi) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४१ दि. ०६/११/२००४.

अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन परिपत्रक क्र. बीसीसी - २००७/ प्र.क्र. ३१५/ १६-ब , दि. १४/१२/२००७ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर शासन परिपत्रकानुसार सरळसेवा भरती व पदोन्नतीमधील मागासवर्गीयांचा दि. ३१/१२/२००२ रोजीचा अनुशेष भरुन काढणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

३. या पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४१ दि. ०६/११/२००४ अन्वये वेतन गट ३ व ४ मधील सरळसेवा प्रवेशाद्वारे भरावयांच्या पदांवर बंदी घातली आहे. तथापी, सरळसेवेद्वारे वेतन गट- १ व २ तसेच पदोन्नतीद्वारे वेतन गट - १ ते ४ मधील अनुशेष भरण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. सदरचे धोरण सद्यस्थितीतही कायम आहे.

४. सबब, सदर शासन परिपत्रकानुसार सरळसेवेद्वारे वेतन गट - १ व २ मधील तसेच पदोन्नतीमधील वेतन गट -१ ते ४ मधील दि. ३१/१२/२००२ चा अनुशेष तात्काळ भरुन काढणेबाबतची कार्यवाही करावी.

५. सरळसेवा भरती वरील बंदी उठविण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून लागू केलेली बंदी उठविल्यानंतर स्वतंत्ररित्या सूचना देण्यात येतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.विद्युत वितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : शासन निर्णयाची प्रत.

मुख्य महाव्यवस्थापक (तां.-आस्था)

**प्रति,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषक यादीनुसार.

C:\My Documents\vidhy...\magasvargiy sarsevapadonatti anushes prashshkiy pariptrk

मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच
पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००७/प्र.क्र ३१५/१६ व
मंत्रालय मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४/१२/२००७

संदर्भ :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००७/प्र.क्र.१२९/०७/१२,
दिनांक २७/८/२००७
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००६/प्र.क्र.१९४/१६-ब,
दिनांक २०/३/२००७

## शासन परिपत्रक

शासकीय/निमशासकीय सेवा तसेच मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा शासकीय अनुदान प्राप्त संस्था , सहकारी संस्था, विद्यापिठे व शासकीय उपक्रम इत्यादींच्या आस्थापनेवरील सरळ सेवा भरती व पदोन्नतीमधील मागासवर्गीयांचा दिनांक ३१.१२.२००२ रोजीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी विशेष भरती मोहिम घेण्यासंबंधीचे आदेश पूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच विशेष भरती मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी संवर्गनिहाय अनुशेषाची पदे भरण्याची जाहिरात देणे, परिक्षा व मुलाखती घेणे यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा अशा सूचनाही दिनांक २० मार्च, २००७ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. तसेच शासनाने शासन निर्णय क्रमांक.एसआरव्ही-२००७/प्र.क्र१२९/०७/१२, दिनांक २७/८/२००७ च्या निर्णयान्वये सर्व संवर्गातील रिक्त पदे ("अ" "ब" "क" "ड") तातडीने भरण्याबाबत सर्व संबंधितांना सुचना दिल्या आहेत.

३. या सुचनेनुसार रिक्त पदे भरतांना मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे देखील प्राधान्याने भरली जातील याबाबत सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

४. याबाबत मुख्य सचिव व्यक्तीशः लक्ष घालीत आहेत. सबब सर्व विभागांनी अनुशेष भरण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य सूचना विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी.

Gr.14.12.2007 A:

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००७१२१४१७३७४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नि.वा. वाडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई.
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग नवीपेठ, पुणे ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वयंरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.

* पत्राने

***. सहाय्यक आयुक्त (मावक) सर्व विभागीय आयुक्त यांची कार्यालये त्यांनी उपरोक्त सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.